वाचले-

१. जाहीरात क्र. १३२६, वायसीएमएच/८ड/कावि/३२/२०१८, दि . १३/०६/२०१८

२. निवड समितीने शिफारस केलेली निवड यादी.

३. मा. आयुक्त यांचा दिनांक २७ /०९/२०१८ रोजीचा मान्य प्रस्ताव.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी १८
यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालय
क्र.वायसीएमएच/८ड/कावि/२४९/२०१८
दिनांक - २७/०९/२०१८.

विषय - गट 'अ' मधील प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक व गट 'ब' मधील सहाय्यक प्राध्यापक या पदावर हंगामी तात्पुरत्या स्वरुपात दरमहा एकत्रित मानधनावर ३ वर्ष कालावधी करीता नियुक्ती करणेबाबत.

आदेश,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयामध्ये नियोजित पदव्युत्तर संस्थेचे काम प्रगतीपथावर आहे. याकामी महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग यांचे कडील शासन निर्णय क्र. पीसीसी-३०१३/प्र.क्र.६०१/नवि-२२, दिनांक ०४ मार्च २०१४. अन्वये विविध संवर्गातील एकूण ११८ पद निर्मितीस मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार पदव्युत्तर संस्थेकरीता विविध संवर्गातील आवश्यक असलेली ६२ पदे भरणेकामी वर्तमानपत्रात जाहिरात क्र. १३२६/२०१८, दिनांक १३/०६/२०१८ रोजी प्रसिद्ध करण्यात आली असुन दिनांक १८/०६/२०१८ ते दिनांक०३/०७/२०१८ पर्यंत अर्ज स्विकारण्यात आलेले आहेत. सदर कालावधीत अर्ज प्राप्त झालेल्या उमेदवारांच्या व मुलाखतीस उपस्थित राहिलेल्या उमेदवारांच्या दिनांक ३०/०७/२०१८ ते ०२/०८/२०१८ या कालावधीत मुलाखती घेण्यात आलेल्या आहेत. सदर उमेदवारांच्या अर्जांची छाननी करुन सदर उमेदवारांची शैक्षणिक अर्हता, अनुभव, व इतर बाबी विचारात घेऊन गठीत केलेल्या निवड समितीने एकुण ११ उमेदवारांची हंगामी तात्पुरत्या स्वरुपात मानधनावर ३ वर्षे कालावधीकरीता निवड करणेकामी शिफारस केलेली आहे. त्यामुळे त्यांचे नियुक्तीस मा. महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे. सदर विषय दिनांक १९/०९/२०१८ रोजी मा. महापालिका सभेकडे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील अनुसूची 'ड' प्रकरण – २ मधील कलम १ K नुसार दाखल केलेला आहे.

भारतीय आयुर्विज्ञान परिषद, दिल्ली यांचेकडील अहवालातील त्रुटींची पुर्तता दिनांक ०३/१०/२०१८ पुर्वी करणे आवश्यक असल्याने नियोजित पदव्युत्तर संस्थेकरीता निवड समितीने शिफारस केलेल्या खालील ११ उमेदवारांची विविध विषयांचे अध्यापक या पदावर विहित अटी व शर्तीवर तसेच त्यांच्या नावापुढे नमुद केलेले दरमहा एकत्रित मानधनावर आदेशाच्या दिनांकापासुन ३ वर्षे कालावधीसाठी तात्पुरत्या स्वरुपात मा. महापालिका सभेच्या मान्यतेस अधीन राहून तातडीने नियुक्ती करावी लागणार आहे.

सबब, मी, आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे -१८ उपरोक्त सर्व बाबी विचारात घेऊन यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालया मधील नियोजित पदव्युत्तर संस्थेकरीता सदर निवड झालेल्या ११ उमेदवारांची अध्यापक या पदावर आदेशाच्या दिनांकापासुन म्हणजे दिनांक २७/०९/२०१८ ते दिनांक २६/०९/२०२१ या ३ वर्षे कालावधीकरीता खालील नमुद केलेल्या अटी व शर्तीवर मा. महापालिका सभेच्या

मान्यतेस अधीन राहुन हंगामी तात्पुरत्या स्वरुपात त्यांचे नावापुढे नमुद केलेल्या दरमहा एकत्रित मानधनावर या आदेशान्वये नियुक्ती करीत आहे.

| अ.क्र | नाव | पदनाम | प्रवर्ग | एकुण पदे | द्यावयाचे मानधन |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | १. डॉ. सुर्यकांत सायन्ना मुनलोड | सहयोगी प्राध्यापक बालरोग | खुला | ०१ | वेतनश्रेणी ३७४००-६७००० अके ग्रेड पे ९००० (एकत्रित मानधन र.रु. १,४७,६८८/-) |
| २ | १. डॉ. हेमराज रामचंद्र नारखेडे<br>२. डॉ. आनंद विजयकुमार कराळे<br>३. डॉ. स्मिता मारोतीराव ठक्करवाड | सहयोगी प्राध्यापक स्त्रिरोग व प्रसुतिशास्त्र | खुला (इमाव)<br>खुला<br>अज | ०३ | वेतनश्रेणी ३७४००-६७००० अके ग्रेड पे ९००० (एकत्रित मानधन र.रु. १,४७,६८८/-) |
| ३ | १. डॉ.मयुर अरुण ठोसर<br>२. डॉ. नियती अर्पण शहा<br>३. डॉ. पुनम सोहनलाल विष्णोई | सहाय्यक प्राध्यापक स्त्रिरोग व प्रसुतिशास्त्र | इमाव<br>खुला<br>खुला | ०३ | वेतनश्रेणी १५६००-३९१०० अके ग्रेड पे ६००० (एकत्रित मानधन र.रु. ७१,५५२/-) |
| ४ | १. डॉ. अनिरुध्द विठ्ठल क्षिरसागर<br>२. डॉ. गजनफर बालनसाब पटेल | सहाय्यक प्राध्यापक अस्थिरोग | खुला<br>खुला | ०२ | वेतनश्रेणी १५६००-३९१०० अके ग्रेड पे ६००० (एकत्रित मानधन र.रु. ७१,५५२/-) |
| ६ | १. डॉ. पुनम सोहनलाल विष्णोई | सहाय्यक प्राध्यापक ANMO | खुला | ०१ | वेतनश्रेणी १५६००-३९१०० अके ग्रेड पे ६००० (एकत्रित मानधन र.रु. ७१,५५२/-) |
| ७ | १. डॉ. पुनम सोहनलाल विष्णोई | सहाय्यक प्राध्यापक MWO | खुला | ०१ | वेतनश्रेणी १५६००-३९१०० अके ग्रेड पे ६००० (एकत्रित मानधन र.रु. ७१,५५२/-) |
| | एकुण | | | ११ | |

अटी व शर्ती –

१. उपरोक्त नमुद तक्त्या मधील उमेदवार यांनी रूजू होताना ते कोणत्याही पदव्युत्तर संस्थेत /शैक्षणिक संस्थेत नोंदणी / काम करत नसले बाबत हमीपत्र करुन देणे बंधनकारक आहे.

२. वरील नमुद सर्व पदांकरीता कामकाजाची वेळ स. ९.००ते सांय. ४.०० वा. अशी राहील.

३. मानधनावरील सेवा कालावधीत स्तंभ क्र ६ मध्ये नमुद केलेप्रमाणे (माहे मे २०१८ च्या वेतन संरचनेनुसार ) होणा-या वेतनाच्या रकमेइतके, उपस्थित दिवसांचे एकत्रित मानधन अनुज्ञेय राहिल. महापालिकेच्या नियमित वेतनश्रेणीतील कर्मचा-यांना लागू असणा-या सुविधा, हक्क, वेतनवाढ, आर्थिक व तदनूषंगिक अन्य कोणतेही लाभ देय राहणार नाहीत.

४. आठवडयातून फक्त एक दिवस साप्ताहिक सुटटी राहील. मानधन कालावधीत दीड महिनाकाम केलेनंतर १ प्रमाणे एकूण ८ किरकोळ रजा देय राहतील. सार्वजनिक अथवा साप्ताहिक सुटटीच्या ज्या दिवशी रुग्णालयाचे कामकाज बंद असते त्या दिवसाची सुटटी उपभोगता येईल. तसेच सार्वजनिक सुटटीचे दिवशी कामकाज करावे लागल्यास, केलेल्या कामकाजा बाबतचा कोणताही मोबदला / फायदे देय राहणार नाहीत.

५. वरील पदांचे कामकाजावर वैद्यकिय अधिक्षक, व अति. आरोग्य वैद्यकीय अधिकारी, वाय. सी.एम. एच. यांचे नियंत्रण राहील.

६. मानधनाचे पदावर काम करताना आपणाकडून सर्वांना नि:पक्षपातीने वागणूक मिळणे आवश्यक आहे.

७. मानधनावरील नियुक्त केलेल्या पदाचे काम सोडताना किमान एक महिना अगोदर लेखी पुर्वसूचना कार्यालयास देणे आपणावर बंधनकारक राहिल. अन्यथा आपणास १ महिन्याचे मानधन महापालिका कोषागारात जमा करावे लागेल.

१५०

८. आपले कामकाज / वर्तणूक असमाधानकारक असल्याचे निर्दशनास आल्यास तसेच आपण विनापरवाना गैरहजर राहिल्यास अथवा आपली हजेरी असमाधानकारक असल्यास आपणास मनपा सेवेची आवश्यकता नसलेचे समजणेत येऊन, कोणतीही पुर्वसूचना न देता आपणास मानधनावरील नियुक्ती दिलेल्या पदाच्या जबाबदारीतुन कार्यमुक्त करणेत येईल.

९. एकत्रित मानधना व्यतिरीक्त अन्य् कोणतेही फायदे मिळणार नाहीत व मासिक मानधन संबंधित रुग्णालयामार्फत ई.सी.एस. द्वारे अथवा बँक खात्यामध्ये जमा केले जाईल.

१०. नियंत्रित प्रमुखांचे सुचनेनुसार आवश्यकतेप्रमाणे कामकाज करणे बंधनकारक राहील.

११. उपरोक्त प्रमाणे मानधनावरील नियुक्ती म्हणजे नोकरी नाही. त्यामुळे महापालिका आस्थापनेवर वेतन श्रेणीत नियुक्ती मिळावी म्हणून निवेदन सादर करणार नाही किंवा तसा बाहय दबाव आणणार नाही. कोणत्याही न्यायालयमध्ये दावा दाखल करणार नाही. याबाबत विहित नमुन्यात (दोन साथीदारांसह संपूर्ण नाव व पत्ता नमुद करणे आवश्यक आहे. ) हमीपत्र लिहून द्यावे लागेल. मानधनावरील नेमणूक पूर्णपणे तात्पुरत्या स्वरुपाची आहे. त्यामुळे कोणत्याही कायमपदी नेमणुकीचा हक्क राहणार नाही.

१२. आयकर नियमाप्रमाणे मानधन रक्कमेतून TDS वजा करुन अंतिम देय रक्कम अदा करणेत येईल.

१३. महानगरपालिकेच्या अन्य कर्मचा-यांप्रमाणे बायोमेट्रीक रजिस्ट्रेशन करणे बंधनकारक असून बायोमेट्रीक हजेरी विचारात घेऊन त्याप्रमाणे मानधन अदा केले जाईल.

१४. सदर उमेदवारांनी आदेशाचे दिनांकापासुन ७ दिवसांचे आत वाय.सी.एम. रुग्णालया मध्ये रुजु व्हावे.

१५. सदर मुदतीत रूजु होते वेळी कागदपत्रांच्या मूळ प्रती तपासणीसाठी आणणे बंधनकारक राहील. मुदतीत रुजु न झालेस आपणास महापालिकासेवेची आवश्यकता नाही असे समजणेत येऊन, तदनंतर सदर रिक्त पदांवर अन्य उमेदवारांची / प्रतिक्षाधीन उमेदवारांची नेमणूक करणेत येईल याची नोंद घ्यावी.

१६. निवड झालेल्या उमेदवाराने खाजगी व्यवसाय करीत नसल्याबाबत व्यवसायरोध भत्ता मिळण्यासाठी विकल्प भरुन देणे आवश्यक आहे. खाजगी व्यवसाय करणा-या अध्यापकांना व्यवसायरोध भत्ता देय रहाणार नाही.

आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी, पुणे – ४११०१८.

प्रति,

सर्व संबंधित

प्रत-

१. लेखा विभाग

२. प्रशासन विभाग